## रे.मु.नं.६९८/२०१७ मधील निशाणी क्र.१५ वरील आदेश

(शरद घारमाळकर वगैरे वि. संतोष भोईटे)

प्रस्तुत दाव्यातील वादी क्र.१ शरद रामचंद्र घारमाळकर हे दिनांक २९.०९.२०२० रोजी मयत झाल्याने त्यांचे वारस पत्नी सुनंदा शरद घारमाळकर, मुले निलेश शरद घारमाळकर व गणेश शरद घारमाळकर यांना अभिलेखावर घेण्यासाठी विलंब झालेला आहे. त्यामुळे वादी क्र.१ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. त्यामुळे अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज अबेटमेंट रद्द होणेसाठी, विलंब माफ होणेसाठी व मयत वादी क्र.१ शरद रामचंद्र घारमाळकर यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जास प्रतिवादीने अर्जाच्या मलपृष्ठावर म्हणणे देऊन वादीचा अर्ज मुदतीत नाही. अर्जातील कारणही खरे नाही. त्यामुळे अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे. अर्ज व म्हणणे पाहिले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. वादी क्र.१ हे दिनांक २९.०९.२०२० रोजी मयत झाले असून त्याचे वारस मुदतीत अभिलेखावर आणले नाहीत. दावा वादी क्र.१ विरुध्द अबेट झालेला आहे. वादींनी प्रस्तुत अर्जाकामी दिलेले कारण संयुक्तीक दिसते. नियोजीत वादी हे मयत वादी क्र.१ चे कायदेशीर प्रतिनिधी असून त्यांना या दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यामुळे खालील आदेश पारीत करण्यात येतो.

### आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी क्र.१ विरुध्द दावा अबेटचा झालेला आदेश रद्द करण्यात येऊन त्याचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो व त्याप्रमाणे नियोजीत वारसांना अभिलेखावर घेण्यास व तद्अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

माळशिरस

दिनांक – ०२.१२.२०२१

(जी.एम.नदाफ)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

माळशिरस

<u>**C E R T I F I C A T E**</u>

I affirm that the contents of this P.D.F. File order are same word to word as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : S.S.Mitragotri |
| Name of the court | : Jt. Civil Judge Jr. Division, Malshiras. |
| Order signed by Presiding Officer on | : 02.12.2021 |
| Order uploaded on | : 03.12.2021 |